"IO"

**N.C.R.B (एन.सी.आर.बी)**
**I.I.F.-I (एकीकृत अन्वेषण फॉर्म - १)**

# FIRST INFORMATION REPORT
**(Under Section 154 Cr.P.C.)**
प्रथम खबर अहवाल
**(कलम १५४ फौजदारी प्रक्रिया संहिता)**

1. **District (जिल्हा):** परभणी  **P.S.(ठाणे):** जिन्तूर
   **FIR No.(प्रथम खबर क्र.):** 0163  **Year (वर्ष):** 2023
   **Date and Time of FIR (प्र. ख. दिनांक आणि वेळ):** 16/05/2023 03:37

2.

| S.No. (अ.क्र.) | Acts (अधिनियम) | Sections (कलम) |
|---|---|---|
| 1 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 7 |

3. (a) **Occurrence of offence (गुन्ह्याची घटना):**
   1. **Day(दिवस):** सोमवार  **Date From (दिनांक पासून):** 15/05/2023
   **Time Period (कालावधी):** पहर 6  **Date To ( दिनांक पर्यंत):** 15/05/2023
   **Time From (वेळेपासून):** 18:00 बजे
   **Time To (वेळेपर्यंत):** 18:00 बजे

   (b) **Information received at P.S. (माहिती मिळालेले पोलीस ठाणे):**
   **Date (दिनांक ):** 16/05/2023  **Time (वेळ):** 03:25 बजे

   (c) **General Diary Reference (रोजनामचा संदर्भ ):**
   **Entry No. (नोंद क्र.):** 010
   **Date & Time (दिनांक आणि वेळ):** 16/05/2023 03:25 बजे

4. **Type of Information (माहितीचा प्रकार):** लेखी
5. **Place of Occurrence (घटनास्थळ):**
   1.(a) **Direction and distance from P.S.(पोलीस ठाण्यापासून दिशा व अंतर):**
   दक्षिण, 1 किमी  **Beat No. (बिट क्र.):**
   (b) **Address (पत्ता):** अमत ज्युस अन्ड नाश्टा सेंन्ट, जिंतुर ,जिंतुर

   (c) **In case, outside the limit of this Police Station, then (या पोलीस ठाण्याच्या हद्दीबाहेर असल्यास):**
   **Name of P.S.(पोलीस ठाण्याचे नाव):**
   **District(State) (जिल्हा(राज्य)):**

6. **Complainant / Informant (तक्रारदार/माहिती देणारा):**

(a) **Name (नाव):** नितीन खंडुजी कोकाटे
(b) **Father's/Husband's Name(वडील / पती चे नाव) :**
(c) **Date/Year of Birth (जन्म तारीख/वर्ष):** 1997
(d) **Nationality (राष्ट्रीयत्व):** भारत
(e) **UID No. (यु.आय.डी. क्र.):**
(f) **Passport No.(पारपत्र क्र.):**
**Date of Issue (दिल्याची तारीख):**
**Place of Issue (दिल्याचे ठिकाण):**
(g) **ID details (Ration Card,Voter ID Card,Passport,UID No.,Driving License, PAN)** ओळखपत्र विवरण (राशन कार्ड ,मतदाता कार्ड ,पासपोर्ट, यूआईडी सं., ड्राइविंग लाइसेंस, पॅन कार्ड )

| S.No. (अ.क्र.) | ID Type (ओळखपत्राचा प्रकार) | ID Number (ओळखपत्राचा क्रमांक) |
|---|---|---|
| 1 | | |

(h) **Address (पत्ता):**

| S.No. (अ.क्र.) | Address Type (पत्याचा प्रकार) | Address (पत्ता) |
|---|---|---|
| 1 | वर्तमान पता | केहाळ, ,ता जिंतुर,जिन्तूर,परभणी,महाराष्ट्र,भारत |
| 2 | स्थायी पता | केहाळ, ,ता जिंतुर,जिन्तूर,परभणी,महाराष्ट्र,भारत |

(i) **Occupation (व्यवसाय):**
(j) **Phone number (फोन नं.):**
**Mobile (मोबाइल नं.):** 91-8007676143

7. **Details of known/suspected/unknown accused with full particulars (माहीत असलेल्या /संशयीत/अनोळखी आरोपीचा संपूर्ण पत्ता):**

| S.No. (अ.क्र.) | Name (नाव) | Alias (उर्फनाव) | Relative's Name (नातेवाईकाचे नाव) | Present Address (वर्तमान पता) |
|---|---|---|---|---|
| 1 | ज्ञानेश्वर उत्तम राठोड | | | 1. संभाजी नगर, ,जिंतूर,जिन्तूर, परभणी,महाराष्ट्र,भारत |

8. **Reasons for delay in reporting by the complainant/informant (तक्रारदार/माहिती देणा-याकडून तक्रार करण्यातील विलंबाची कारणे):**

9. **Particulars of properties of interest (संबंधीत मालमत्तेचा तपशील):**

| S.No. (अ.क्र.) | Property Category (मालमत्ता वर्ग) | Property Type (मालमत्ता प्रकार) | Description (वर्णन) | Value(In Rs/-) (मुल्य (रू. |
|---|---|---|---|---|
| 1 | नाणे आणि चलन | भारतीय- रुपया | 500/ रू. दराच्या 14 चलनी नोटांना | 7,000.00 |

10 **Total value of property (In Rs/-)**
**(चोरीस गेलेल्या मालमत्तेचे एकूण मुल्य (रू. मध्ये)):**

7,000.00

11. **Inquest Report / U.D. case No., if any**
**(इन्क्वेस्ट अहवाल/ अकस्मात मृत्यू प्रकरण क्र.,जर असल्यास)):**

| **S.No.** (अ.क्र.) | **UIDB Number** (यु.आय.डी.बी.क्र.) |
|---|---|

12. **First Information contents (प्रथम खबर हकीकत ):**

फिर्याद दिनांक 15/05/2023

मी नितीन खंडुजी कोकाटे, वय 26 वर्श, व्यवसाय f'kक्षण (बी.ए.), रा. केहाळ, ता.जिंतुर, जि. परभणी, मो.नं. 8007676143.

फिर्याद देतो की, मी वरील ठिकाणचा राहणारा असुन परभणी येथे शिक्षण घेतो. नमुना नं 8 चा उतारा व शबरी घरकुल योजने अंतर्गत नवीन घरकुलाचा प्रस्ताव मंजुर करण्यासाठी अनुसुचित जमाती या प्रवर्गासाठी कोणतीही शासकीय फी शासनाकडुन आकारण्यात येत नाही. त्यामुळे माझे वडील नामे खंडुजी कोकाटे यांचे नावे केहाळ येथे शबरी घरकुल योजने अंतर्गत नवीन घरकुलाचा प्रस्ताव सादर करण्यासाठी गट क्र. 176 येथील नमुना नं 8 ची आवश्यकता असुन ते देण्यासाठी आमच्या गावचे ग्रामसेवक राठोड यांनी मला दि. 26/04/2023 रोजी 5,000/- रूपयांची मागणी केली असुन त्याच दिवशी वडीलांच्या नावे घरकुल योजनेचा नवीन प्रस्ताव मंजुर करण्यासाठी 2,000/- रू. असे एकुण 7,000/- रू. लाचेची मागणी केल्याने दि. 27/04/2023 रोजी अॅन्टी करप्शन ब्युरो, परभणी येथे तक्रार देवुन त्यासोबत 7,000/- रुपये जमा केले.

दिनांक 27/04/2023 रोजी मी दिलेल्या तक्रारीवरुन पोलीस उप अधीक्षक श्री किरण बिडवे, अॅसीबी, परभणी यांनी आगार प्रमुख, राज्य परिवहन महामंडळ, परभणी यांचे कार्यालयातुन दोन पंच नामे 1) श्री. रामदास दत्तराव पांचाळ, वय 46 वर्षे, व्यवसाय नौकरी एस.टी. वाहक, राज्य परीवहन महामंडळ, परभणी आगार, रा. सत्कार कॉलनी, दत्तधाम, वसमत रोड, परभणी ता.जि. परभणी व 2) श्री. जावेद हबीब अन्सारी, वय 46 वर्षे, व्यवसाय नौकरी एस.टी. चालक, राज्य परिवहन महामंडळ, परभणी आगार, रा. कुर्बान अलि शाह नगर, दर्गारोड, परभणी यांना अॅन्टी करप्शन ब्युरो, परभणी येथे बोलावुन घेवुन त्यांची व माझी ओळख करून देवुन मी माझी तक्रार पंचांना तोंडी कथन केली. त्यानंतर पोलीस उप अधीक्षक श्री किरण बिडवे साहेब यांनी माझी हस्तलिखीत तक्रार पंचांना वाचण्यास दिली. दोन्ही पंचानी माझी तक्रार वाचून त्यावर पोलीस उप अधीक्षक श्री किरण बिडवे साहेबांनी व दोन्ही पंचानी सहया केलेल्या आहेत.

त्यानंतर पोलीस उप अधीक्षक बिडवे साहेब यांनी सापळा पथकातील पोह निलपत्रेवार, पोह हानुमंते, पोषि षेख मुक्तार, पोषि जिब्राईल शेख यांना त्यांचे मोटारसायकलने अॅ.सी.बी. कार्यालय, परभणी येथुन जिंतुरकडे रवाना केले व त्यांचे पाठोपाठ बिडवे साहेब, पोनि वाघमारे, पोशि कदम व दोन्ही पंच, चापोह कदम असे शासकीय वाहन क्र. एम.एच. 22/डी 7257 ने अॅ.सी.बी. कार्यालय परभणी येथुन 15.00 वा. निघुन बोरी मार्गे जिंतूर षहराच्या अलिकडे मैनापुरी माळावर 16.00 वा. पोहचलो आणि षासकीय वाहन आडोषाला उभे केले.
त्यानंतर करण्यात आलेल्या पडताळणी कार्यवाही दरम्यान पोशि शेख मुक्तार यांनी व्हाईस रेकॉर्डर चालु करुन माझ्याकडे देवुन मला व पंच क्र. 1 पांचाळ यांना पोलीस कर्मचारी निलपत्रेवार यांची मोटार सायकल क्रमांक एमएच 22-एजी-8021 ने ग्रामसेवक राठोड यांची भेट घेण्यासाठी त्यांचे खाजगी कार्यालयाकडे पाठविण्यात आले. परंतु ग्रामसेवक राठोड यांचे खाजगी कार्यालय बंद असल्याने त्यांची भेट झाली नाही. त्यामुळे मी ग्रामसेवक राठोड यांना फोन लावला असता ग्रामसेवक राठोड यांनी ते बाहेरगावी गेले असल्याचे सांगुन मला दुस-या दिवषी येण्यास कळविले. त्यादिवशी माझी व ग्रामसेवक राठोड यांची भेट झाली नाही. त्यामुळे माझ्या विनंती वरुन दिनांक 28/04/2023 रोजी पडताळणी कार्यवाही करण्याचे ठरविण्यात आले.

त्यानंतर दिनांक 28/04/2023 रोजी करण्यात आलेल्या पडताळणी कार्यवाहीच्या वेळी मी लोकसेवक राठोड यांना फोन करून ते कोठे आहेत याबाबत माहिती घेतली असता त्यांनी मला राधारमण क्लॉथ सेंन्टर, जिंतूर येथे येण्यास सांगितले. त्यामुळे ग्रामसेवक राठोड यांची भेट घेण्यासाठी पोशि शेख मुक्तार यांनी व्हाईस रेकॉर्डर चालु करुन देवुन मला व पंच क्र. 1 पांचाळ यांना माझ्याकडील माझा मित्र नामे मारोती फुपाटे याची मोटार सायकल क्रमांक एमएच 22-एक्यु-0944 ने ग्रामसेवक राठोड यांनी मला बोलावलेल्या ठिकाणी राधारमण क्लॉथ सेंन्टर, जितूर येथे

पाठविण्यात आले. माझे व ग्रामसेवक राठोड यांचे भेटी दरम्यान ग्रामसेवक राठोड यांनी मला माझ्या वडीलांचे नावे नवीन घरकुल प्रस्ताव मंजुरीकरीता वरिष्ठांकडे पाठविण्यासाठी व नमुना नं 8 उतारा देण्यासाठी 7,000/- रू. लाचेची मागणी करून लाच रक्कम राधा रमन क्लॉथ सेंटर येथे घेउन येण्यास सांगितले. त्यामुळे दि. 28/04/2023 रोजी राधा रमन क्लॉथ सेंटर, जिंतुर येथे सापळा आजमाविण्याचे सर्वानुमते ठरविण्यात आले.

त्यानंतर दि. 28/04/2023 रोजी करण्यात आलेल्या सापळा कार्यवाही दरम्यान पोशि शेख जिब्राईल यांनी अॅथ्रासीन पावडर व अल्ट्राव्हायलेट लॅम्पचे गुणधर्म सांगुन प्रात्यक्षिक करून दाखवले. लाचेची रक्कम 7,000/- रू. ज्यामध्ये 500/- रू. दराच्या 14 चलनी नोटांना अॅथ्रासीन पावडर लावुन माझे शर्टच्या छातीवरील डाव्या बाजुचे खिशात ठेवले. त्यानंतर लाचेची रक्कम 7,000/- ग्रामसेवक राठोड यांना देण्यासाठी मी व पंच क्र. 1 पांचाळ असे माझेकडील मोटार सायकलने व्हाईस रेकॉर्डरसह राधा रमन क्लॉथ सेंटर, जिंतूर येथे गेलो. राधारमण क्लॉथ सेंन्टरचे समोर माझी व ग्रामसेवक राठोड यांची भेट झाली. त्यावेळी ग्रामसेवक राठोड यांनी मला पंचायत समिती, जिंतूर येथे येण्यास सांगितले. त्यामुळे मी व पंच क्र 1 पांचाळ असे पंचायत समिती, जिंतूर येथे गेलो. परंतु तेथे ग्रामसेवक राठोड उपस्थित नसल्याने आमची भेट झाली नाही. त्यामुळे मी त्यांच्या मोबाईल वर संपर्क केला परंतु त्यांचा मोबाईल बंद येत असल्याने सापळा कार्यवाही तात्पुरती स्थगित करुन दि.02/05/2023 रोजी जिंतूर येथे सापळा आजमाविण्याचे ठरविण्यात आले.

दिनांक 02/05/2023 रोजी करण्यात आलेल्या सापळा कार्यवाही दरम्यान मी व पंच क्र. 1 पांचाळ असे ग्रामसेवक राठोड यांना लाचेची रक्कम 7,000/- रू. देण्यासाठी डिजीटल व्हाईस रेकॉर्डरसह माझ्याकडील मित्राची मोटार सायकल क्रमांक एमएच 22-एक्यु-0944 ने आमदार कॉलनी, जिंतूर येथील ग्रामसेवक राठोड यांचे खाजगी कार्यालयात भेटण्यासाठी गेलो. त्यावेळी ग्रामसेवक राठोड यांची भेट झाली नाही. त्यामुळे पुन्हा दुस-या वेळी मी आणि पंच क्र. 1 असे दोघे माझेकडील मोटार सायकलने पुन्हा ग्रामसेवक यांची भेट घेण्यासाठी राठोड यांचे आमदार कॉलनी जिंतूर येथील खाजगी कार्यालयात गेलो. त्यावेळी त्यांची व माझी भेट झाली असता त्यांनी लाचेची रक्कम त्यांचा खाजगी ऑपरेटर संदीप याचे जवळ लाचेची रक्कम देण्यास सांगितले. त्यानंतर मी ऑपरेटर संदीप यांची भेट घेतली त्यावेळी संदीप याने मला लाचेची मागणी केली नाही म्हणून मी संदीपला लाचेची रक्कम दिली नाही. सदर दिवशीची सापळा कार्यवाही तात्पुरती स्थगित करुन नंतर सापळा आजमाविण्याचे ठरविण्यात आले.

त्यानंतर आज दि. 15/05/2023 रोजी मी पोलीस उप अधीक्षक श्री. किरण बिडवे यांना फोन करून मी आज रोजी ग्रामसेवक राठोड यांची भेट घेणार आहे असे कळविल्याने बिडवे साहेब व सापळा पथक असे शासकीय वाहणाने मैनापुरी येथे आले असता सापळा कार्यवाही सुरू केली. ज्यामध्ये सापळापुर्व कार्यवाही दरम्यान मला, पंचांना व सापळा पथकास प्रत्येकाच्या कामाबाबत पोलीस उप अधीक्षक किरण बिडवे यांनी सूचना दिल्या. पोषि/कदम यांनी अॅथ्रॅसिन पावडर व अल्ट्राव्हायलेट लॅम्पचे गुणधर्म व वापराबाबत माहिती देवुन प्रात्यक्षिक करून दाखविले व लाचेची रक्कम 7,000/- रू. ज्यामध्ये 500/- रू. दराच्या 14 चलनी नोटांना अॅन्थ्रासीन पावडर लावून माझे अंगावरील शर्टच्या छातीवरील डाव्या बाजूचे खिशात व्यवस्थित ठेवून दिली. त्यानंतर मी व पंच क्र. 1 पांचाळ असे आम्ही ग्रामसेवक राठोड यांना लाचेची रक्कम देण्यासाठी मी सोबत आणलेल्या मोटार सायकलने आमदार कॉलनी, जिंतूर येथील ग्रामसेवक राठोड यांच्या खाजगी कार्यालयाकडे निघालो आमच्या मागे सापळा पथक निघाले.

त्यानंतर मी व पंच क्र. 1 पांचाळ असे आमदार कॉलनी, जिंतूर येथील ग्रामसेवक राठोड यांच्या खाजगी कार्यालयात गेलो त्यावेळी ग्रामसेवक राठोड यांच्या कार्यालयात बरीच माणसे असल्याने मी माझ्या कामाचा विशय न काढता कार्यालयातील मंडळी निघुन जाण्याची बराच वेळ वाट पाहिली. ब-याच वेळाने ग्रामसेवक राठोड हे काहीएक न बोलता कार्यालयातुन निघुन गेले. मी व पंच क्र. 1 पांचाळ त्यांच्या पाठोपाठ पंचायत समिती, जिंतूर येथे गेलो परंतु तेथे ग्रामसेवक राठोड हे दिसुन आले नाहीत. त्यामुळे आम्ही पंचायत समिती येथेच ग्रामसेवक राठोड येण्याची वाट बघत थांबलोत. त्यानंतर काही वेळाने ग्रामसेवक राठोड हे पंचायत समिती, जिंतूर येथील गेटच्या समोर आले. तेथे माझी व ग्रामसेवक राठोड यांची माझ्या प्रलंबित कामासंबंधी चर्चा झाली. मी त्यांना कामासंबंधाने बोलुन काम करण्याची विनंती करू लागलो त्यावेळी ग्रामसेवक राठोड हे पंचायत समिती समोरील अमृत ज्युस अॅन्ड नाश्टा सेन्टर येथे गेले मी व पंच क्र. 1 पांचाळ असे त्यांच्या पाठोपाठ अमृत ज्युस अॅन्ड नाश्टा सेन्टर येथे गेलो त्यावेळी ग्रामसेवक राठोड यांनी पंचासमक्ष तोंडाने पैशाचा काही विषय नाही. पैशाचा काही विषय नाही असे म्हणत होते परंतु त्याच वेळी ग्रामसेवक राठोड यांनी हाताच्या इषा-याने लाचेची रक्कम त्यांच्या शर्टच्या छातीवरील खिशात ठेवण्याचा इशारा केला. त्यामुळे मी सदरची रक्कम त्यांच्या खिशामध्ये ठेवली. त्यानंतर मी सापळा पथकास दिसेल अशा रितीने पूर्वनियोजित इशारा करताच आरोपी लोकसेवक राठोड यांना सापळा पथकाने ताब्यात घेतले त्यावेळी पोशि शेख मुख्तार यांनी माझ्या जवळील व्हाईस रेकॉर्डर ताब्यात घेवुन 18:00 वा बंद केले. पोह हनुमंते यांनी आलोसे

राठोड यांचा डावा हात व पोह निलपत्रेवार यांनी उजवा हात पकडला. त्यानंतर आरोपी लोकसेवक राठोड यांना अमृत ज्युस अ◌ॅन्ड नाश्टा सेंन्टर मध्ये घेवुन गेले आणि त्याला त्याचे नाव गाव विचारले असता त्याने त्याचे नाव ज्ञानेश्वर उत्तम राठोड, वय 29 वर्श, व्यवसाय ग्रामसेवक केहाळ, ता. जिंतूर, रा. गडदगव्हाण, ह.मु. संभाजी नगर, जिंतूर, जि. परभणी असे सांगितले. त्यावेळी पंच क्र. 1 व 2 यांच्या समक्ष सापळा अधिकारी यांनी आरोपी लोकसेवक यांना माझ्याकडुन स्विकारलेली लाचेची रक्कम कुठे आहे असे विचारले तेव्हा आरोपी लोकसेवक राठोड यांनी नमुद 7,000/- रू. लाचेची रक्कम त्यांच्या अंगावरील शर्टच्या छातीवरील खिशात असल्याचे सांगितले पंचासमक्ष त्यावेळी ज्युस सेंन्टर मध्ये कृत्रीम अंधार करून पोशि शेख जिब्राईल यांनी आरोपी लोकसेवक यांच्या शर्टच्या खिषात अल्ट्राव्हायोलेट लॅम्पचा प्रकाश टाकला असता त्यांचे खिशात हिरवट रंगाची चकाकी स्पष्टपणे दिसुन आली. त्यानंतर पंच क्र. 2 यांनी आरोपी लोकसेवक यांच्या शर्टच्या खिशातुन लाचेची रक्कम काढुन पंच क्र. 1 यांचेकडे दिली. त्यानंतर पंच क्र. 2 यांच्याकडे असलेली नोटांच्या वर्णनाचे चिठ्ठी काढुन लाचेची रक्कमेतील नोटांची वर्णनाचे खात्री केली. सदर नोटांवर अल्ट्राव्हायोलेट लॅम्पचा प्रकाष टाकला असता त्यावर हिरवट रंगाची चकाकी स्पष्टपणे दिसुन आली.

आरोपी लोकसेवक ज्ञानेश्वर उत्तम राठोड, वय 29 वर्श, व्यवसाय ग्रामसेवक केहाळ, ता. जिंतूर, रा. गडदगव्हाण, ह.मु. संभाजी नगर, जिंतूर, जि. परभणी (वर्ग-3) यांनी माझ्या वडीलांच्या नावे शबरी घरकुल योजना अंतर्गत घरकुलाचा प्रस्ताव व नमुना नं. 8 उतारा देण्यासाठी साठी मला 7,000/- रू. लाचेची मागणी करून ती आज दि. 15/05/2023 रोजी पंचासमक्ष अमृत ज्युस अ◌ॅन्ड नाश्टा सेंन्टर समोर 18◌:00 वा. स्विकारली आहे. म्हणुन माझी त्यांचे विरूध्द कायदेशीर तक्रार आहे.

समक्ष फिर्याद दिली सही

( किरण बिडवे )
पोलीस उप अधीक्षक,
अ◌ॅन्टी करप्शन ब्युरो, परभणी

13. **Action taken: Since the above information reveals commission of offence(s) u/s as mentioned at Item No. 2. (केलेली कारवाईः बाब क्र.२ मध्ये नमूद केलेल्या कलमान्वये वरील अहवालावरून अपराध घडल्याचे.)**

(1) **Registered the case and took up the investigation: (प्रकरण नोंदविले आणि तपासाचे काम हाती घेतले):**

KUNDANKUMAR Bapurao WAGHAMARE(I (Inspector)) / PQBN72855 **or (किंवा)**

(2) **Directed (Name of I.O.) (तपास अधिका-याचे नाव):**

**Rank (पद):** **No.(क्र.):**

**to take up the Investigation (ला तपास करण्याचे अधिकार दिले) or (किंवा)**

(3) **Refused investigation due to (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला):**